(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XIII / Issue – III ISSN 2277-8063

# डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांचे धर्मचिंतन

**प्रा. डॉ शीला रत्नाकर** प्रमुख, मराठी विभाग मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर.

---

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार व देशाच्या उज्वल भविष्याचा विचार करणारे क्रांतिकारी पुढारी, महान देशभक्त व अस्पृश्यांच्या जीवनात स्वाभिमाना समवेत मानव मुक्तीचा सूर्य दाखविणारे महान, पराक्रमी, विश्ववंदनीय, युगपुरूष भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विसाव्या शतकातील विचारशील चिंतनशील व कर्तुत्ववान महापुरूष म्हणून गणले जातात. मानवी मुल्यांसाठी समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या महापुरूषांपैकी ते एक देशभक्त होते. भारतीय अस्पृश्य जातीत ते जन्माला आले त्यामुळे दलित समाजाचे दु:ख काय? त्यांनी स्वत: अनुभवले होते अशा अस्पृश्य समाजाचे जीवनमान उंचवावे, त्यांना समाजात प्रतिष्ठा मिळावी स्वत:च्या हक्कांची जाणीव व्हावी, म्हणून जिवापाड प्रयत्न केले 'मी हिंदू धर्मात जन्माला आलो तरी हिंदू धर्मात मरणार नाही' अशी जी घोषणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केली होती. ती हिंदुत्व वादाच्या प्रदीर्घ अभ्यासाने व अनुभवाने यात शंका नाही.

**धर्म व हिंदू तत्वज्ञानाविषयी चिंतन –**

धर्म व हिंदू तत्वज्ञानाविषयी डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात 'धर्म म्हटला की त्यात निश्चितपणा असतो मात्र तत्वज्ञान म्हटले की त्यात मोढमपणा असतो. दुसरे कारण असे की, धर्म व तत्वज्ञान हे एकमेकांचे वैरी नसले तरी विरोधक आहेत. त्यामुळे एका बाजूला ईश्वरवादी व दुसऱ्या बाजुला तत्वज्ञानी असे दोघे एकमेकांची टिंगल उडवून त्यांचा एकमेकातील विरोध दाखवित असतात. धार्मिक तत्वज्ञान म्हणजे काय? याबाबत दोन सुप्रसिध्द लेखकाची मते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली आहेत. प्रोफेसर प्रिंगले पॅटिसन यांच्या मते, "प्लोटोने सांगितल्याप्रमाणे जगाचा दृष्टीकोण सारांश रुपाने तत्वज्ञानात व्यक्त होत असतो. त्यामुळे वेगवेगळया विभागाचे 'तत्वज्ञान' तयार होते जसे कलेचे तत्वज्ञान, कायद्याचे तत्वज्ञान, वगैरे याप्रमाणे 'धर्माचे तत्वज्ञान' असते त्यात धर्माच्या इतिहासाच्या घटना व मानवाचा धार्मिक अनुभव यांची सर्वसाधारण अनुमाने मोडतात".[1] दुसरे लेखक टायले यांच्या मते, "काही धर्म मृत आहेत, काही जिवंत आहेत त्याचप्रमाणे जगही दोन प्रकारचे आहे. सुसंस्कृत जग, तसे असंस्कृत जग आहे या दोन्ही प्रकारच्या जगाशी चालू व मृत अशा सर्व धर्माचा जो संबंध असतो त्यातून धार्मिक तत्वज्ञान निर्माण होते. अर्थात धर्माचा इतिहास म्हणजे धर्माचे तत्वज्ञान नव्हे अगर धर्माचे शास्त्र नव्हे तर अनेक धार्मिक घटनातून अशी समान तत्वे शाोधून काढावी लागतील की, त्याची पाळेमुळे मनुष्य प्राण्यांच्या स्वभावात आहेत."[2] डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मते वरील लेखकांनी धार्मिक तत्वज्ञानांविषयी केलेल्या व्याख्या, अगर स्पष्टीकरण म्हणजे दुसरे तिसरे काही नसून निरनिराळया धर्माचा तुलनात्मक अभ्यास असे त्यास म्हटले पाहिजे. धर्माचे तत्वज्ञान या विषयात बाबासाहेबांच्या मते, तीन गोष्टी मोडतात पहिली गोष्ट धर्म म्हणजे काय? दुसरी गोष्ट धर्मामागील नियोजन कोणते? तिसरी गोष्ट धर्माच्या कसोट्या कोणत्या? हे समजून घेतल्यानंतर धर्माचा अर्थ लक्षात येईल.

**धर्म म्हणजे काय? -**

धर्म म्हणजे काय? या बददल सर्वत्र एकमत दिसून येत नाही. धर्माच्या अर्थाबद्दल निरनिराळया मतामध्ये विस्तृतपणे जावे लागेल. हिंदुत्वाच्या तत्वज्ञानाची छाननी करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदूधर्म म्हणजे हिंदू 'थियॉलॉजी' या अर्थाने तो शब्द वापरला आहे. धर्माचा हा अर्थ अपुरा आहे. असेही ते नमूद करतात. कारण देव शास्त्रे ही निरनिराळया प्रकारची आहेत पौराणिक दंत कथावर आधारलेले एक देवशास्त्र आहे. दुसरे नागरी देवशास्त्र आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या चर्चेत धर्म म्हणून या दोन्ही प्रकारच्याही देवशास्त्रांचा उपयोग केला नाही. कोणत्याही धर्मातील कायम स्वरूपी प्रभावशाली भाग कोणता व त्या धर्मातील आवश्यक भागापासून अनावश्यक भाग कसा दूर करावा ही एक मोठी अडचण असते. या बाबतीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रो. रॉबर्टसन स्मिथ व प्रो. मॅक्स मुल्लर यांची या विषयावरील मते नमूद केली आहेत.

प्रो. रॉबर्टसन स्मिथ यांनी, "जगातील एकूण सर्व धर्माच्या इतिहासाला भू-गर्भशास्त्राची उपमा दिली आहे! "भू-गर्भाशास्त्राप्रमाणे जसे पृथ्वीच्या पोटात जुने– नवे अवशेष सापडतात त्याचप्रमाणे निरनिराळया धर्मातील जुने-नवे विचार तसेच जुने-नवे अवशेष सापडतात. एकमेकाशेजारी अगर एकावर एक असलेले सापडतात"[3]

भारतातील धर्माच्या जंगल वाढीबद्दल प्रो. मॅक्स मुल्लरने असे मत व्यक्त केले आहे की, "वेदामधील बहुतेक मंत्रात शुध्द बालीश प्रार्थना आहेत. त्या केव्हाच निकालात काढावयास हव्या होत्या निदान ब्राम्हणी धर्मातील ब्राम्हणे व यज्ञयागाचे नियम केले त्यावेळी ते हटवावयास हवे होते. आणि ब्राम्हणे लिहिल्यानंतर यज्ञाचा फोलपणा, व देवादिकांचे खरे स्वरूप कळल्यानंतर ब्राम्हणे निलंबित करावयास हवी होती. फक्त उपनिषदे हे त्यांच्या उपयुक्तते पुरतीच ठेवावयास हवी होती. परंतु

तसे भारतात घडले नाही उलट वेदापासून उपनिषदापर्यंतचे नियम तसेच वेगवेगळे राहिले एवढेच नव्हे तर परस्पर विरोधी बनले."[४] ज्या धर्मामध्ये जाणीवपूर्वक अगर जाणुनबुजून योजना केलेली असते ते धर्म निराळे व अशी जाणीवपूर्वक योजना नसलेले धर्म निराळे जाणूनबुजून जीवन मार्गाची योजना करणाऱ्या धर्मात हिंदू धर्म मोडतो. कारण मनुस्मृतीच्या रुपाने त्यांचे जबरदस्त लेखी कोडच (संहिता) बनविण्यात आलेली आहे.

**हिंदू धर्म आणि मनुस्मृती –**

हिंदू धर्म हा मानवतेचा धर्म नव्हे सामान्य माणसाला यात पोषक असा आहार नाही. सामान्य माणसाच्या दु:खावर यात कसलाही आराम नाही. सामान्य दुर्बलाला कसली ही मदत नाही. हिंदू धर्म सामान्य माणसाला अंधारात सोडतो व सामान्य माणसाला निसर्गाशी तोंड देत देत प्राणास मुकावे लागते. हिंदू धर्म, सुपरमनचे (अवतारांचे) कुरण आहे. तर सामान्य जनाचे भकास जीवन आहे. हिंदूचे धर्मशास्त्र वेदात व भगवद्गीतेत आहे असे हिंदू म्हणतात. हिंदू लोक असेही म्हणतील की मनुस्मृतीत हिंदू धर्म शास्त्र आहे असे जे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गृहित धरले आहे ते चुकीचे आहे अशा आशयाची टिका होईल हे त्यांना आधीच माहित होते. त्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्पष्टीकरण असे आहे की, सनातनी, हिंदूपैकी कोणीही मनुस्मृतीचा आधिकार फेटाळून लावण्याइतके धैर्यवान असतील असे त्यांना वाटत नव्हते. म्हणून स्मृतिंना हिंदू मध्ये कसे स्थान प्राप्त झाले व कसा अधिकार प्राप्त झाला याचे स्पष्टीकरण करणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना संयुक्तिक वाटले. स्मृतिचे स्वरूप मुलत: कसे होते? वेदामध्ये प्रविण असणाऱ्यांनी शिफारस केलेल्या व मंजुर केलेल्या सामाजिक परंपरा, रूढी व प्रथा या संबंधीचे नियम स्मृतिमध्ये होते हे नियम पंडितांनी केवळ स्मरणात ठेवलेले होते म्हणून त्या नियमांना स्मृति असे म्हणत असत स्मृतिची तुलना श्रृतिशी केली म्हणजे ऐकलेले श्रवण केलेले नियम. तर स्मृति म्हणजे स्मरणात ठेवलेले नियम स्मृतिच्या नियमांचे एकत्रिकरण केले तरी वेदातील नियमांशी त्याची तुलना करता, स्मृतींना दुय्यम स्थान असे. नंतर मात्र स्मृतिंना श्रृतिपेक्षा वर चढवून वेदासमान दर्जा देण्यात आला. स्मृतिंचा दर्जा उंचावण्यासाठी अनेक मार्गांचा अवलंब करण्यात आला होता. अशा प्रकारे स्मृतींना हिंदू धर्म शास्त्राचा मुलाधार समजण्यात येऊ लागले. "स्मृतिंनी हिंदू समाजाच्या सामाजिक व धार्मिक संस्था, रुढी, इत्यादी ठरविण्याच्या बाबतीत त्याचप्रामणे आधुनिक हिंदूत्वाच्या जडणघडणीत मोठेच कार्य केलेले आहे"[५] स्मृतिंना असा सर्वोच्च दर्जा देण्यात ब्राम्हणांचा शुद्ध स्वार्थ होता. कारण त्यात वर्णाश्रम होते. त्यात ब्राम्हणांचे सर्व श्रेष्ठत्व होते

**भगवद्गीता: मनुस्मृतिची छोटी आवृत्ती -**

वेदामध्ये चातुवर्णाचा सिध्दांत आहे. याबद्दल वाद असल्याचे कारण नाही. ते चातुवर्ण्य ऋग्वेदाच्या पुरूष सुक्तातच नमूद करण्यात आले आहे. सदर पुरूष सुक्तात दोन तत्वे मात्र करण्यात आलेली आहेत. समाजात आदर्श म्हणून चार वर्ण असावेत हे त्यात मान्य करण्यात आले आहे. हे एक तत्व, दुसरे तत्व वेदात मान्य करण्यात आले ते असे की या वर्णाचे एकमेकांशी असणारे नाते, विषमतेचे असले पाहिजे. हे दुसरे तत्व. वेदातील शिकवण अशी आहे. भगवद्गीतेत हेच तत्व सांगितले आहे. या बद्दलही वाद असण्याचे कारण नाही. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. भगवद्गीतेत श्री कृष्णाने स्वत:चे मत व्यक्त केले आहे "चातुवर्ण नावाने ओळखली जाणारी व्यवस्था मी स्वत:च निर्माण केलेली असून त्यानुसार ज्या त्या वर्णाच्या लोकांच्या क्षमतेप्रमाणे त्यांचे धंदे त्यांना वाटून दिलेले आहेत. चातुवर्णाचा जनक मीच आहे."[६] वेद, गीता, स्मृती या तिन्हीमध्ये मुख्य गाभा एकच आहे. तोच प्रकार तोच धागा व तिन्ही वस्त्रे एकच आहेत. कारण हिंदूच्या शास्त्रांचे लेखक बहुतेक सर्वजण उपनिषदे सोडल्यास ब्राम्हण असल्याने मनुस्मृतीतील सिध्दांत त्यांनी मोठ्या काळजीपुर्वकरित्या वेदात भगवद्गीतेत घुसडले आहेत.

**हिंदू धर्म विषयक विचार –**

हिंदूच्या धर्मशास्त्रात 'धर्म' हा शब्द कोणत्या अर्थाने वापरला आहे याची मांडणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्मशास्त्राचा सखोल अभ्यास करून केलेली आहे. धर्म हा शब्द ऋग्वेदामध्ये ५८ वेळा आलेला आहे. ऋग्वेदात धर्म हा शब्द निरनिराळ्या याच अर्थाने वापरलेला आहे त्याचे प्रकार असे १. पुरातन रूढी म्हणजे धर्म २. कायदा म्हणजे धर्म ३. समाजात शांतता सुव्यवस्था राखणारी व्यवस्था म्हणजे धर्म या प्रकारच्या अर्थामधून हे दिसून येईल की हिंदू तत्वज्ञानामध्ये धर्म हा शब्द कायदा व निती अशा दोन्ही अर्थाने वापरलेला आहे. म्हणून धर्म प्राप्त करण्यात अगर नवा धर्म स्विकारण्यास आधुनिक समाजात सामाजिक अभिसरणाची आवश्यकता नसते. उदाहरणार्थ एका राष्ट्राचा नागरिक दुसऱ्या राष्ट्राचे नागरिकत्व स्वीकारू शकतो. तांत्रिक दृष्ट्या इंग्लीश भाषेमध्ये 'नॅचरलायझेशन' असे म्हणतात. नॅचरलायझेशनमध्ये धर्माला स्थान नाही. म्हणजे धार्मिक अभिसरण न घडताही सामाजिक अभिसरण आधुनिक समाजात घडू शकते. 'आधुनिक समाज' त्या समाजास म्हणतात की, तो समाज केवळ मानवांचाच आहे. एवढेच नव्हे तर तो समाज वेगवेगळया उपासकवाल्यांचाही

आहे. 'धर्म ही एक सामाजिक शक्ति आहे.' असे धर्माचे वर्णन हबर्ट स्पेन्सरने अर्थपूर्ण केले आहे. त्यांच्या वर्णनाप्रमाणे इतिहासाचे धागे उभे असतात. तर सर्व बाजूने वीण करून जाळे तयार करणारे सर्व धागे धर्माचे असतात. हे प्रत्येक समाजाला लागू आहे. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते भारताच्या इतिहासाची याबाबतची स्थिती काही निराळीच आहे. बंधानी बांधलेला हिंदू धर्म आहे. भारताच्या इतिहासात धर्मांनी असे जाळे विणले आहे. एवढेच नव्हे तर हिंदू धर्माचा इतिहास उभ्या धाग्या बरोबर आडव्या धाग्यानींही हिंदू मन बनले आहे. हिंदूच्या जीवनाचा प्रत्येक क्षण धर्माने नियंत्रित केला आहे. जिवंत असताना हिंदूने कसे वागावे, मेल्यानंतरही प्रेतांची विल्हेवाट कशी लावावी याचे फर्मान हिंदू धर्माने काढले आहे. धर्म ही सामाजिक शक्ति आहे. धर्म ही ईश्वरी नियंत्रणाची योजना आहे. योजना आस्तित्वात दिसत नसली तरी ती आदेशाप्रमाणे प्रत्यक्षात पूर्णपणे कार्य करते. धर्म विरहीत अशा आर्दशपेक्षा धार्मिक अशा आदर्शामागे केवढी तरी मोठी शक्ति असते. ऐहिक फायद्यापेक्षा धार्मिक आदर्शाची पकड मोठी असते. धर्माकडे दुलर्क्ष करणे म्हणजे जिवंत वीज वाहणाऱ्या ताराकडे दुर्लक्ष करण्यासारखे आहे.

**धर्मांतराची घोषणा -**

दि.१३ ऑक्टोबर १९३५ येवला जि. नाशिक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले होते. "माझ्या दुर्देवाने मी अस्पृश हिंदु म्हणून जन्माला आलो, ही उणीव दूर करण्याचे सामर्थ्य माझ्यात नाही. परंतु अस्पृश्य हिंदु म्हणून मला भोगाव्या लागणाऱ्या आपमानास्पद नियमापुढे मान वाकवण्याचे, नाकारण्याचे हिंदुधर्माचा त्याग करण्याचे माझ्या स्वाधीन आहे असे नाही. जाहीरपणे सांगतो की मी जरी अस्पृश्य हिंदू म्हणून जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही."[७] हिंदू धर्माचा त्याग करुन मुस्लिम, ख्रिश्चन. बौद्ध यापैकी वा कोणत्या धर्माचा स्विकार करावयाचे हे व्यक्तिश: ठरवावे. मात्र कोणताही धर्म स्विकारण्यापूर्वी त्यात त्यांना समतेने वागवण्यात येईल असे आश्वासन घेण्यास विसरु नये. आपल्या लोकांनी धर्मांतर करावे की नाही याप्रश्नाचे उत्तर देणे कठीणच आहे. कारण हिंदूलोकांना जर प्राणाहून प्रिय धर्म आहे. ज्या धर्मात माणसाला  माणूसकी नाही, तो धर्म काय कामाचा? असे अनेक प्रश्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भेडसावत राहिले. धर्मांतराशिवाय दुसरा उपाय नाही हे त्यांनी ओळखले होते. म्हणूनच "मी स्वत: हिंदू धर्मात राहणार नाही व हिंदू म्हणून घेणार नाही. दुसरी गोष्ट मुसलमान होणार नाही तिसरा कोणता तरी धर्म स्विकारीन तूर्त माझा कल बुद्ध धर्माकडेच आहे."[८] असे दि.१२/०९/१९३३ रोजी लंडनहुन त्यांचे सहकारी सवादकर यांना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात. अस्पृश्यांना न्याय मिळावा म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अविरत अनेक आंदोलने केली. २५ डिसेंबर व २६ डिसेंबर १९२७ रोजी मनुस्मृती दहनाचा कार्यक्रम आयोजीत केला. अखिल भारतीय शेड्यूल्ड कास्टस् फेडरेशनच्या कानपूर येथे भरलेल्या अधिवेशनात दिनांक ३०/०१/४५ रोजी दिलेले भाषण दिनांक १०/०२/४५ च्या जनता या पत्रकातुन 'आपल्या हालाकीचे मूळ कारण हिंदू धर्म' या मथळयाखाली छापले गेले ते असे "आज जी आपण चळवळ सुरु केली आहे ती मोठ्या प्रमाणात झाली पाहिजे, परंतु त्याचबरोबर आपल्या चळवळीचे मूलतत्व काय आहे, हे आपण समजावून घेतले पाहिजे, अस्पृश्यांची स्थिती आपण सगळे जाणता, २००० वर्षापासून आपली विचित्र परिस्थिती होण्याचे कारण काय? आपली अवनती केव्हा पासून आहे व ती कधी मिटेल? आपल्या हालाखीच्या स्थितीचे मोठे कारण हिंदू धर्म आहे. हिंदू धर्मात शिवाशिवीला धर्म मानतात. व त्यालाच हिंदूधर्माचा मूळ पाया समजला जातो. हिंदू धर्मात अस्पृश्यांना शिक्षणाची मनाई आहे. शिक्षण मोठे मुश्कीलीचे आहे, शिक्षण घेणे मोठे मुश्किलीचे आहे. प्रत्येकाने या देशाचा शिपाई बनले पाहिजे. स्वच्छ कपडे अंगावर घालता आले पाहिजे. व सर्व धार्मिक विषमता नष्ट झाली पाहिजे. तशी स्थिती अस्पृश्यांची नाही. आपली दुर्दशा जर नष्ट करावयाची असेल तर आपण हिंदु धर्माचा त्याग केला पाहिजे. हिंदू धर्म सोडल्याशिवाय आपले दु:ख कधीही नष्ट होणार नाही."[९] धर्मांतराशिवाय दुसरा उपाय नाही हे त्यांनी ओळखले होते म्हणूनच 'हिंदू म्हणून जन्मलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही' अशी घोषणा त्यांनी केली होती. ती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दि.१४ ऑक्टोबर १९५६ रोजी बौध्दधम्माची दीक्षा घेऊन पूर्ण केली.

**धम्मचक्रप्रवर्तन दिनाची सुरुवात-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दि.१४ ऑक्टोंबर १९५६ विजयादशमी रोजी दीक्षा समारंभ वॅक्सीन इन्स्टिट्यूट जवळच्या एका मैदानात दक्षिण अंबाझरी मार्ग नागपूर येथे बुद्ध धम्मीय नागलोक यांच्या प्राचीन पूण्यभूमीत महास्यवीर भिख्खू चंद्रमणी यांच्या हस्ते स्वत: डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौध्द धम्माची दिक्षा घेतली आणि आपल्या लाखो अनुयायांना बौद्ध धम्माची दिक्षा दिली. हे ठिकाण दिक्षाभूमी या नावाने प्रसिद्ध आहे. हिंदूधर्माचा त्याग करुन तथागत गौतम बुद्धाचे समतावादी, जीवनवादी, तत्वज्ञान स्वीकारले यालाच 'धम्मचक्र प्रवर्तन दिन.' असे म्हणतात. हजारो वर्षांच्या हिंदू धर्मातील गुलामगिरीतून सुटका करुन घेतली. इ.स.पूर्व ६२४ मध्ये जन्मलेल्या गौतम बुद्धाने मानसाच्या दु:खाचा उगम

तृष्णेत असल्याचे सांगून तृष्णेपासून मुक्तता मिळावी म्हणून अष्टांगमार्ग सुचविला. हा धम्मविचार सामाजिक क्रांतीचा परिवर्तनाचा विचार असल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वीकारला. बौद्धम्म हा धम्म आहे तो धर्म नाही. धर्म म्हटले की देव, कर्मकांड, अंधश्रद्धा रुढी परंपरा यांचा समावेश असतो. जुने धर्म, धर्ममार्तंड हे कर्मठ आणि अमानवी परंपरेचे पालन करणारेच होते. उलट बुध्दाजवळ सर्वांना सामावून घेणारे विशाल हृद्य होते. बुध्दांचा विचार हा तत्वज्ञान आणि विज्ञान निष्ठा यांवर आधारित असल्याने स्वांतत्र्य समता, बंधुता, प्रज्ञशिल करुणा स्वयंप्रकाशित व्हा अशी शिकवण देणारा बुध्दाचा धम्मविचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वीकारून आपल्या अनुयायांना दिला आणि नव्या युगाची सुरुवात केली.

**समारोप -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगातील अनेक धर्मांचा अभ्यास केलेला होता. भारतातील हिंदू धर्माचे सखोल चिंतन करून आपले विचार मांडले. भारतीय घटना आणि धर्मांतर या अतिशय मौलिक महत्वपूर्ण ऐतिहासिक घटना भारतीय इतिहासाला वळण देणाऱ्या ठरल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वानदिन ६ डिसेंबर १९५६ रोजी झाले. कोट्यावधी लोकांनी अत्यंत जड अं:तकरणाने असामान्य अलौकीक अशा महामानवास मुंबईच्या दादर चौपाटीवर अखेरच निरोप दिला. त्याला आता चैत्यभूमी नावाने ओळखली जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा हा जिवनप्रवास सरते शेवटी तथागत गौतम बुध्दांच्या चरण कमळाजवळ येऊन थांबला. हा चिरंतर प्रेरणादायी जीवनप्रवास येणाऱ्या आगामी युगांना एकच शाश्वत संदेश देत राहील. 'स्वयंमप्रकाशित व्हा! बुद्धम सरणंम् गच्छामी'.

**संदर्भ:**

१. ॲड कांबळे बी. सी. समग्र आंबेडकर चरित्र, खंड सहावा सुगावा प्रकाशन, पूणे. पृ. क्र. ४

२. तत्रैव पृ. क्र. ४

३. तत्रैव पृ. क्र. ५

४. तत्रैव पृ. क्र. ६

५. तत्रैव पृ. क्र. ३०

६. तत्रैव पृ. क्र. ३०,३१

७. गायकवाड प्रदिप, (संपा) डॉ. बाबासाहेब आंबेडकारांची समग्र भाषणे खंड १. १९५७ क्षतिज पब्लिकेशन, डॉ. आंबेडकर कॉलनी लष्करी बाग, नागपूर, पृ.क्र.१७१

८. गणवीर रत्नाकर, (संपा) विलायतेहून डॉ. बाबासाहेबांची पत्रे, रत्नमित्रा प्रकाशन, नागपूर- ४ व्दितीय आवृत्ती १४ ऑक्टोंबर १९८४ विजयादशमी पृ.क्र. १०४,१०५

९. प्रा. गांजरे मा.फ. (संपा) बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे खंड ५ अशोक प्रकाशन, ३/ बॅनर्जी लेआऊट नागपूर- २७, २ ऑक्टोंबर १९८७ पृ.क्र.६२,६३